# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ

कृषि नगर, वसमत रोड,

परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र)

| | |
|---|---|
| ई-मेल : reg_mau@rediffmail.com | दूरध्वनी : (०२४५२) २२९७५५ |
| वेबसाईट : www.vnmkv.gov.in | फॅक्स : (०२४५२) २२९७५५,२२३५८२ |


**संदर्भ:** १. महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परिनियम,१९९० मधील परिनियम क्र. ८८ (२) व (३)

२. कृषि परिषद, पुणे यांचे पत्र क्र. मकृप/ शिक्षण-१६/का-२/१५८५/०६, दि.१३ सप्टेंबर,२००६

३. विद्यापीठ कार्यकारी परिषद ठराव क्र.०५/११.०२.२०२२

**क्रमांक२०२२/सं.क्र.४९९/आस्था-३/12757** **दिनांक ३०/०६/२०२२**

## परिपत्रक

महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेच्या दि.२४ जुलै,२००६ रोजी झालेल्या ६९ व्या बैठकीमध्ये कृषि विद्यापीठांतर्गत लिपीकवर्गीय पदांची शैक्षणिक अर्हता निश्चित केलेली आहे. सहा. कक्ष अधिकारी व वरीष्ठ लिपीक या संवर्गातील पदोन्नतीची पदे भरण्याकरीता, सदरील संवर्गाच्या शैक्षणिक अर्हतेमध्ये खालीलप्रमाणे अंशत: बदल करण्याबाबतचा विषय संदर्भ क्र.०३ वरील विद्यापीठ कार्यकारी परिषदेच्या ठरावानुसार मान्य करण्यात आला आहे.

| अ. क्र. | पदाचे नाव व कृषि परिषद, पुणे यांच्या दि.१३ सप्टेंबर,२००६ रोजीच्या पत्रानुसार लागू असलेली सध्याची शैक्षणिक अर्हता | विद्यापीठ कार्यकारी परिषद ठराव क्र.०५/११.०२.२०२२ नुसार पदोन्नतीची पदे भरण्याकरीता शैक्षणिक अर्हतेत मान्य करण्यात आलेले अंशत: बदल |
|---|---|---|
| १ | **कक्ष अधिकारी/समकक्ष**<br>(वेतनश्रेणी एस-१५:४१८००-१३२३००)<br>कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची किमान पदवी उत्तीर्ण किंवा दि.२८/०२/१९९१ पूर्वी कृषि विद्यापीठ सेवेत असणाऱ्या उमेदवारासाठी एस.एस.सी/ तत्सम परीक्षा उत्तीर्ण. | बदल नाही. |
| २ | **सहा. कक्ष अधिकारी/समकक्ष**<br>(वेतनश्रेणी एस-१४:३८६००-१२२८००)<br>कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची किमान पदवी उत्तीर्ण किंवा दि.२८/०२/१९९१ पूर्वी कृषि विद्यापीठ सेवेत असणाऱ्या उमेदवारासाठी एस.एस.सी/ तत्सम परीक्षा उत्तीर्ण. | कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची किमान पदवी उत्तीर्ण किंवा दि.२८/०२/१९९१ पूर्वी कृषि विद्यापीठ सेवेत असणाऱ्या उमेदवारासाठी एस.एस.सी/ तत्सम परीक्षा उत्तीर्ण.<br>**तथापि** *निम्न संवर्गात कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांपैकी ज्या कर्मचाऱ्यांची या विद्यापीठामधील एकुण सेवा २० वर्षापेक्षा जास्त झाली आहे, अशा कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परिनियम,१९९० च्या परिनियम क्र.८८(२) व (३) नुसार पदवीधारक असणे या शैक्षणिक अर्हतेपासून सूट राहील.* |
| ३ | **वरीष्ठ लिपीक/समकक्ष**<br>(वेतनश्रेणी एस-८:२५५००-८११००)<br>कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची किमान पदवी उत्तीर्ण किंवा दि.२८/०२/१९९१ पूर्वी कृषि विद्यापीठ सेवेत असणाऱ्या उमेदवारासाठी एस.एस.सी/ तत्सम परीक्षा उत्तीर्ण. | |

सहा. कक्ष अधिकारी व वरीष्ठ लिपीक या संवर्गाच्या शैक्षणिक अर्हतेमध्ये पदोन्नतीची पदे भरण्याकरीता वरीलप्रमाणे करण्यात आलेले अंशत: बदल हे दि.११/०२/२०२२ पासून लागू राहतील.

**मा. कुलगुरू महोदय यांच्या मान्यतेने,**

३०/०६/२२

**(धिरजकुमार रा. कदम)**
**कुलसचिव**

*मागील पानावर...*